RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक ९६(२)] शनिवार, जुलै ३०, २०१६/श्रावण ८, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २०२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जुलै २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक आरटीएस. २०१६/प्र. क्र. १२४(१)/१८ (र.व का.).—ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३१) च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ शासनाने, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण २०१५/प्र. क्र. ४५/१८ (र. व का.), दिनांक १७ जून २०१६ अन्वये, मुंबई येथे महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग स्थापन करण्यास, तसेच महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक महसुली विभागात (एकूण सहा) त्यांच्या कार्यालयाची स्थापना करण्यास मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये “ महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग ” **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा स्थापन करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३१) मधील कलम १३ च्या पोट-कलम (१) व (२) अन्वये, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **महाराष्ट्र शासन,** मुंबई येथे “ महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग ” व प्रत्येक महसुली विभागासाठी एक (एकूण सहा) राज्य लोकसेवा हक्क आयुक्त यांची कार्यालये गठित करीत आहे ; ज्यामध्ये एक राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, ज्यांची अधिकारिता मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यांपुरती असेल ; आणि प्रत्येक महसुली विभागासाठी प्रत्येकी एक (एकूण सहा) राज्य लोकसेवा हक्क आयुक्त, ज्यांची अधिकारिता मुंबई शहर जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हा यांचे क्षेत्र वगळून संबंधित महसुली विभागापुरती असेल, यांचा समावेश असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. पी. एस. मीना,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya (Annexure), Mumbai 400 032, dated the 30th July 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. RTS. 2016/C. R. 124 (1)/18 (O & M).—Whereas, the Government has, for carrying out the purposes of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), accord sanction for the constitution of the Maharashtra State Commission for Right to Public Services, at Mumbai including its offices in every Revenue Division (total six), in the State of Maharashtra, *vide* Government Resolution, General Administration Department, No. MISC-2015/C.R.45/18 (O&M), dated the 17th June 2016 ;

And whereas, it is necessary to constitute the Maharashtra State Commission for Right to Public Services under sub-section (*1*) of section 13 of the said Act, by issuing notification in the *Official Gazette*.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 13 read with sub-section 2 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), the Government of Maharashtra hereby constitute the Maharashtra State Commission for Right to Public Services, at Mumbai and offices of the Commissioners at every Revenue Division (total six), consisting of one State Chief Commissioner for Right to Public Services having jurisdiction for Mumbai City District and Mumbai Suburban District, and one State Commissioner for Right to Public Services having jurisdiction for each corresponding Revenue Division, excluding the area of Mumbai City District and Mumbai Suburban District.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. P. S. MEENA,
Additional Chief Secretary to Government.